# ***<u>प्रकरण १</u>***

## *भारतीय बँक प्रणाली*

**१.१ भारतीय अर्थव्यवस्थेत बँक प्रणालीची रचना**

**१.२ बँक व्यवसायाची उत्क्रांती**

**१.३ अनुसूचित व बिगर अनुसूचित बँक यातील फरक**

**१.४ भारतीय बँक व्यवसायावर कोरोना (covid१९) चा झालेला परिणाम**

**१.५ आर्थिक वृद्धी आणि विकासातील बँक प्रणालीची भूमिका**

# *भारतीय बँक प्रणाली -:*

**बँकिंग व्याख्या –** “पैशांचे विविध प्रकारचे व्यवहार करणारी संस्था म्हणजे बँक.”

**भारतीय बँकिंग कायद्याची व्याख्या -:** "जनतेद्वारे मागितल्याबरोबर अथवा शोधन करण्यासाठी किंवा धनादेश,आदेश इ.द्वारे परत करण्याच्या अटीवर जनतेकडून रकमेच्या स्वरूपात ठेवी स्वीकारून त्या गुंतवणूक करण्याच्या कार्याचा बँकिंगमध्ये समावेश होतो.”

''बँक पत निर्माण करणारे तसेच विनिमयाची सेवा देणारे यंत्र आहे."

**वरील व्याख्यांवरून बँकांची वैशिष्ट्ये याप्रमाणे** -:

१) बँक हि पैशांच्या देवघेवीचे व्यवहार करणारी संस्था आहे.

२) बँक हे पैसा सुरक्षित ठेवण्याचे आणि कर्ज मिळवण्याचे ठिकाण आहे.

३) बँक हि नफा कमविण्याचा व्यवसाय करणारी संस्था आहे.

४) बँकिंग व्यवसायात भांडवल इतरांचे व लाभ मात्र बँकेचा असतो.

**बँकांचे प्रकार-:** १) व्यापारी बँका

२) विकास बँका

३) सहकारी बँका

४) प्रादेशिक ग्रामीण बँका

५) स्थानिक क्षेत्रीय बँका

**बँक प्रणालीचे महत्व :-**

१) पतपत्रांचे वितरण

२) हुंडणावळीचा व्यवहार

३) भागविक्रीची हमी घेणे

४) मौल्यवान वस्तू व अन्य मौल्यवान दस्तऐवज सांभाळणे

५) माहिती गोळा करणे व ती प्रसिद्ध करणे

६) मध्यस्त म्हणून काम करणे

७) योग्य बचत व गुंतवणूक

८) संपत्तीचे रोकडीत रूपांतर

९) भांडवल गतिमान करणे

१०) उद्योग व्यापाराला प्रोत्साहन

११) बचतक्षमता वाढवणे

१२) व्याजदरावर परिणाम

## भारतातील बँकिंग  व्यवसाय -:

देशातील व्यापारी बँकांना शंभरहून अधिक वर्षांचा इतिहास आहे .ब्रिटिशांच्या काळात ईस्ट इंडिया कंपनीशी  व्यापारी संबंध झाल्यानंतर काही एजंटांनी बँकसेवा देणाऱ्या संस्था १९व्या शतकाच्या सुरुवातीस सुरु केल्या .

बंगाल,मद्रास,मुंबई  या इलाख्यामध्ये अनुक्रमे १८०६,१८४०,१८४३ मध्ये  सरकारच्या पुढाकाराने व्यापारी बँका सुरु झाल्या.देशातील पहिली आधुनिक व्यापारी बँक तिची स्थापना १८८१मध्ये झाली .

१९२०-३० च्या महंमदीत अनेक बँका बुडाल्या . धोकादायक व्यवहार ,अपुरे

भांडवल ,अपुरा राखीव निधी ,तीव्र

स्पर्धा यामुळे बँका कमकुवत झाल्या

## भारतीय अर्थव्यवस्थेत बँकप्रणालीची भूमिका  :-

१) भांडवल निर्मिती

२) संयोजन कौशल्य वाढविणे

३) कर्जाचे रोख रकमेत रूपांतर करणे

४) व्यापार वाढ

५) प्रादेशिक समतोल

६) पैशाच्या पुरवठ्यात लवचिकता आणणे

७) उद्योग - व्यवसायांचे आधुनिकीकरण

## ***सर्वोच बँक संस्था -:***

**१)भारतीय औद्योगिक विकास बँक -:**

दीर्घकालीन औद्योगिक कर्जपुरवठ्याच्या क्षेत्रातील सर्वोच्च बँक संस्था म्हणून या बँकेची १९६४ साली स्थापना करण्यात आली. ही रिझर्व बँकेची संलग्न संस्था म्हणून निघाली; मोठ्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगसंस्थांना प्रत्यक्ष वित्तसाहाय्य ही बँक करते.

**२) भारतीय लघुउद्योग विकास बँक -:**

एप्रिल १९९० मध्ये लघुउद्योग विकास बँक ही स्वतंत्र व सर्वोच्च बँक संस्था अस्तित्वात आली. भारतीय औद्योगिक विकास बँकेच्या संपूर्ण बँकेची अशी ही संलग्न संस्था असून लघुउद्योगांच्या बाबतीत मुख्य बँकेची (IDBI) पुनर्वित्तपुरवठा, विनिमय बिलांची फेरवटावणी , बीज-भांडवलासाठी सहभाग खरेदी, अल्प मुदतीच्या व्यापारी हुंड्यांची फेरवटावणी अशी कामे ही बँक करते.

**३) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक -:**

रिसर्व बँकेचे शेती पतपुरवठा खाते ग्रामीण नियोजन आणि पतकक्ष तसेच कृषी पुनर्वित्त विकास महामंडळ ही तिन्ही एकत्र करून १९८२ साली या संपूर्ण बँकेची (नाबार्डची)स्थापना करण्यात आली. कृषी आणि ग्रामीण विकास यांच्या संदर्भातील पतपुरवठा कार्य, विकास कार्ये, आणि नियमन कार्ये ही तिन्ही कार्ये या बँकेकडे आहेत.

**४) भारतीय निर्यात - आयात बँक -:**

परराष्ट्र व्यापाराच्या क्षेत्रातील सर्वोच्च बँक संस्था म्हणून या बँकेची स्थापना १९८२ साली करण्यात आली. निर्यात आणि आयात व्यापाराला वित्तपुरवठा करणे, विदेशात संयुक्त प्रकल्प उभारण्यास मदत करणे, भाडे खरेदी तत्वावर यंत्रसामग्रीची आयात - निर्यात करण्यास वित्तसाहाय्य करणे ही या बँकेचे प्रमुख कामे आहेत.

**५) भारतीय औदयोगिक गुंतवणूक बँक -:**

आजारी कारखान्याच्या पुनर्वसनासाठी १९७१ साली स्थापन केलेल्या औद्योगिक पुनर्रचना महामंडळाचे १९८५ साली 'भारतीय औद्योगिक पुनर्रचना बँक' असे नामकरण करण्यात आले. तेच पुढे १९८७ साली 'भारतीय औदयोगिक गुंतवणूक बँक' हे नाव धारण करून 'मर्यादित कंपनी' या स्वरूपात कार्यरत झाले. उद्योगसंस्थाना कर्जे देणे, त्यांच्या समभागांची/डिबेंचर्सची हमी घेणे, केंद्र/राज्य सरकारांचे तसेच रिसर्व बँकेचे प्रतिनिधित्व करणे इत्यादी कार्ये ही बँक करते.

**६) राष्टीय गृहनिर्माण बँक -:**

रिसर्व बँकेच्या संपूर्ण मालकीची संस्था म्हणून या बँकेची स्थापना जुलै १९८८ मध्ये झाली. गृहनिर्माणासाठी कर्ज देणाऱ्या विविध स्तरांवरील संस्थांची सर्वोच्च बँक म्हणून ही बँक काम करते. गृहकर्ज संस्था आणि गृहकर्ज देणाऱ्या बँका यांना ही बँक पुनर्वित्त सवलत देते.

## *विकास बँका -:*

**१) भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ -:**

ही पहिली विकास बँक असून १९४८ साली महामंडळ म्हणून तिची स्थापना झाली होती. १९९३ साली संयुक्त भांडवली संस्था म्हणून या महामंडळाचे रूपांतर करण्यात आले. दीर्घकालीन प्रकल्प वित्तपुरवठा, भागभांडवलातील भागीदारी अथवा कर्ज हमी; सामग्रीच्या खरेदीसाठी वित्तपुरवठा आणि तांत्रिक सल्ला, साहस भांडवल इत्यादींसारख्या प्रवर्तनात्मक सेवा अशा तिहेरी मार्गांनी हे महामंडळ वित्तसाहाय्य करते.

**२) औद्योगिक कर्ज आणि गुंतवणूक महामंडळ (ICICI) -:**

संयुक्त भांडवली संस्था म्हणून १९५५ साली स्थापन झालेल्या या महामंडळाचे सहभाग सार्वजनिक क्षेत्रातील वित्तसंस्थानीच खरेदी केलेले आहेत. जागतिक बँकेचे कर्ज भारतात वितरित करण्यासाठी म्हणून मुख्यतः या महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**३) राज्य वित्तीय महामंडळे -:**

आज देशात अठरा राज्य वित्तीय महामंडळे अस्तित्वात आहेत. लघु आणि मध्यम उद्योगसंस्थांच्या विकासासाठी ही राज्यस्तरीय महामंडळे एक कोटी रुपयांपर्यंत भांडवल असणाऱ्या संस्थांना कर्जरूपाने मदत करतात.

**४) राज्य औद्योगिक विकास महामंडळे -:**

राज्य सरकारांच्या संपूर्ण मालकीच्या कंपन्या स्वरूपाची २२ महामंडळे आज अस्तित्वात आहेत. कर्जे सहभागातील वाटा इत्यादी नेहमीच्या मार्गांनी कर्जपुरवठा करण्याव्यतिरिक्त तांत्रिक - आर्थिक पाहणी, संभाव्यता अभ्यास आणि प्रशिक्षणासारख्या विकास कार्यांनाही ही महामंडळे मदत करतात.

**५) भूविकास बँका -:**

शेतीच्या विकासाच्या गरजांसाठी म्हणून या बँका कार्य करतात. यंत्रे, ट्रॅक्टर, पंपसेट इत्यादींच्या खरेदीसाठी तसेच नवीन जमिनीच्या खरेदीसाठी लागणारी दीर्घकालीन कर्जे या बँकांकडून शेतीक्षेत्राला दिली जातात. नाबार्डकडून यांना पुनर्वित्त पुरवठा मिळतो

## *अनुसूचित बँका आणि अननुसूचित बँका यातील फरक -:*

रिसर्व बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ अन्वये दुसऱ्या अनुसूचीमध्ये नोंदलेल्या सर्व बँका 'अनुसूचित बँका' (Scheduled Banks) म्हणून ओळखल्या जातात.

| **फरकाचे मुद्दे** | **अनुसूचित बँका** | **अननुसूचित बँका** |
|---|---|---|
| १. अर्थ | आर.बी.आय. ऍक्ट (Act), १९३४ च्या दुसऱ्या श्येडुलमध्ये समाविष्ट असलेल्या बँकांना 'अनुसूचित बँका' असे म्हटले जाते. | आर.बी.आय. ऍक्ट (Act), १९३४ च्या दुसऱ्या श्येडुलमध्ये समाविष्ट नसलेल्या बँकांना 'अननुसूचित बँका' असे म्हटले जाते. |
| २. प्रवर्ग | सर्व बँका प्रादेशिक ग्रामीण बँका आणि राज्य सहकारी बँका या अनुसूचित बँका आहेत. | सध्या देशामध्ये अननुसूचित बँक एकमेव आहे. |
| ३. वित्तीय साहाय्य | मान्यताप्राप्त जमीन/तारण/रोखे किंवा हुंडी यांच्या बदल्यात अनुसूचित बँका 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' कडून कर्जरुपात किंवा उधार स्वरूपात वित्तीय मदत घेऊ शकतात. | अननुसूचित बँका 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' कडून कोणत्याही स्वरूपाची मदत घेऊ शकत नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| ४. परतावा | सर्व अनुसूचित बँकांनी त्यांच्या वित्तीय व्यवसायाच्या बाबतीत परतावे (Returns) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियायाकडे नियमित वेळेनुसार भरणे प्राप्त आहे. | अननुसूचित बँकांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियायाकडे त्यांच्या वित्तीय व्यवसायाबाबत सर्व परतावे (Returns) भरलेच पाहिजेत अशी सक्ती नाही. |
| ५. पैसे पाठविण्याची सुविधा | अनुसूचित बँकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया सवलतीच्या दरात पैसे पाठविण्यासाठी सुविधा (Remittance) पुरविते. | अननुसूचित बँकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून कोणतीही पैसे पाठविण्यासाठी सुविधा (Remittance) मिळत नाही. |